This question paper contains **3** printed pages]

# A—427—2018

**FACULTY OF ARTS**

**B.A. (First Year) (Second Semester) EXAMINATION**

**OCTOBER/NOVEMBER, 2018**

MARATHI (Optional)

Paper IV

(आधुनिक मराठी कवितेतील प्रवाह)

(MCQ & Theory)

**(Saturday, 24-11-2018)** **Time : 10.00 a.m. to 12.00 noon**

*Time*—2 *Hours* *Maximum Marks*—40

*N.B.* :— (*i*) **सर्व** प्रश्न सोडवा.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**MCQ**

1. खालील वस्तुनिष्ठ प्रश्न सोडवा : 10

(*i*) 'सोसाटीचं कर्ज डोई झाला भार
नरड्याला दोर गरिबांच्या'

— अशी ग्रामीण जीवनाची व्यथा कोणत्या कवितेतून प्रकट झाली आहे ?

(*a*) गाव (*b*) संसार

(*c*) आयुष्याची धुनी (*d*) पेटली शिवारं

(*ii*) खालीलपैकी कोणता काव्यसंग्रह यशवंत मनोहर यांचा आहे ?

(*a*) उत्थानगुंफा (*b*) कोंडवाडा

(*c*) दंभस्फोट (*d*) गोलपिठा

(*iii*) शंकर वाडेवाले यांची 'आयुष्याची धुनी' ही कविता कोणत्या काव्यसंग्रहातून घेतली आहे ?

(*a*) मायीच गाणं (*b*) थेंब थेंब पाऊस

(*c*) माती बोले गूज (*d*) आभाळमाती

P.T.O.

EF34F4D77D56A5729A27756F9958AD08

(*iv*) 'रस्त्याच्या मधोमध कोसळलेल्या विवस्त्र बाईच्या अंगावर
घालावी एखादी चादर असं वाटत नाही कुणालाच अलिकडे'
— अशी संवेदनाहीन भावना कोणत्या कवयित्रीच्या कवितेतून व्यक्त झाली आहे ?

(*a*) नीरजा (*b*) रजनी परूळेकर

(*c*) अनुराधा पाटील (*d*) हिरा बनसोडे

(*v*) .............................................. या कवितेतून चळवळीला वाहून घेतलेल्या महानगरातील कार्यकर्त्यांचे भावविश्व संवादी शैलीतून साकार झाले आहे.

(*a*) पोस्टर (*b*) सायरनचे शहर

(*c*) शहरांच्या सीमांवर (*d*) आयुष्याच्या प्रत्येक संध्याकाळी

(*vi*) 'मी तोडले तुरूंगाचे दार' या काव्यसंग्रहाचे कवी कोण आहेत ?

(*a*) बाबाराव मडावी (*b*) माधव सरकुंडे

(*c*) भुजंग मेश्राम (*d*) वाहरू सोनवणे

(*vii*) 'फिर्याद' या काव्यसंग्रहाच्या कवयित्री कोण आहेत ?

(*a*) हिरा बनसोडे (*b*) नीरजा

(*c*) अनुराधा पाटील (*d*) रजनी परूळेकर

(*viii*) 'आयुष्याच्या प्रत्येक संध्याकाळी' या कवितेचे कवी कोण आहेत ?

(*a*) उत्तम कांबळे (*b*) सतीश काळसेकर

(*c*) अरुण काळे (*d*) नारायण सुर्वे

(*ix*) 'ब्रह्म सटवीची कारस्थाने
पुसली जावोत त्यांच्या
ललाटावरील या माझ्या शब्दांनी'
— अशी अंतरीक तळमळ कोणत्या कवितेतून व्यक्त झाली आहे ?

(*a*) माणसांसाठी आरती (*b*) कोंडवाडा

(*c*) उपाय (*d*) पँथर एकलव्य

EF34F4D77D56A5729A27756F9958AD08

(*x*) 'चळवळ म्हणजे माणुसकीचा गाभा सतत विकसित होत जाणारा प्रवाह' असे चळवळीचे मूलगामी चिंतन कोणत्या कवीने केले आहे ?

(*a*) भुजंग मेश्राम (*b*) बाबाराव मडावी

(*c*) माधव सरकुंडे (*d*) वाहरू सोनवणे

**Theory**

2. खालीलपैकी कोणताही **एक** प्रश्न सोडवा : 10

(*i*) 'पँथर एकलव्य' या कवितेतून आत्मभान जागृत झालेला विद्यार्थी कवीने कसा चित्रीत केला आहे, ते लिहा.

(*ii*) 'माणूस, गाव आणि शिवार' यांचा परस्परसंबंध 'गाव' या कवितेच्या आधारे स्पष्ट करा.

3. खालीलपैकी कोणताही **एक** प्रश्न सोडवा : 10

(*i*) आदिवासींच्या वाट्याला येणाऱ्या दु:खाची जाणीव 'कुपोषण' या कवितेतून कवीने कशी करून दिली आहे, ते लिहा.

(*ii*) 'शापित वांझ बेटावर' या कवितेतून पुरुषप्रधान मानसिकतेचा कसा समाचार घेतला आहे, ते स्पष्ट करा.

4. खालीलपैकी कोणताही **एक** प्रश्न सोडवा : 10

(*i*) शहरातील हरवत चाललेल्या मानवी संवेदनाबद्दलची तीव्र खंत कवी उत्तम कांबळे यांनी कशी व्यक्त केली आहे, ते लिहा.

(*ii*) कवयित्री बहिणाबाई चौधरी यांचा संसाराबद्दलचा उपदेश उदाहरणांसह स्पष्ट करा.



EF34F4D77D56A5729A27756F9958AD08